महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: jeevanshikshan@maa.ac.in

# ॥ परिपत्रक ॥

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी खाजगी निर्मात्यांकडून शैक्षणिक चित्रपट / लघुचित्रपट परीक्षणासाठी प्राप्त प्रस्ताव सादर करण्याच्या मुदतीबाबत...**

संदर्भ:

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२५/प्रशिक्षण, दि. ०५ मार्च २०२०.
२. शैक्षणिक साहित्य दाखविण्याबाबतचे धोरण: शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४९/प्रशिक्षण, मंत्रालय, मुंबई दि. ०९ ऑक्टोबर २०२४.
३. शासन पत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२५/(१६०४२११), दि. २७ जुलै २०२६.
४. मा. संचालक, रा.शै.सं.प्र.प., महाराष्ट्र, पुणे यांची मान्य टिपणी दिनांक ०६ ऑगस्ट २०२६.

महाराष्ट्र राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी खाजगी निर्मात्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक चित्रपट व लघुचित्रपटांची (मराठी/हिंदी माध्यम) गुणवत्ता, तांत्रिक दर्जा आणि शैक्षणिक उपयुक्तता तपासण्यासाठी राज्यस्तरावर चाचणी व परीक्षण करण्याची प्रक्रिया या कार्यालयामार्फत राबविण्यात येते.

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त निर्देशांनुसार, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी खाजगी चित्रपट निर्मात्यांनी शैक्षणिक चित्रपट व लघुचित्रपट परीक्षणासाठीचे प्रस्ताव आले आहेत. तथापि, प्रशासकीय कारणांमुळे सदर कामकाज प्रक्रियेस झालेला विलंब विचारात घेता, अधिकाधिक गुणवत्तापूर्ण शैक्षणिक चित्रपट विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावेत या उद्देशाने प्रस्ताव व परीक्षण शुल्क भरणा करण्याची मुदत **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत आहे.

**नियम व अटी / सूचना:**

प्रस्ताव व परीक्षण शुल्क सादर करण्याची अंतिम तारीख: **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६** (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत).

माध्यम: चित्रपट / लघुचित्रपट फक्त मराठी किंवा हिंदी माध्यमात असावेत.

प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण: प्रसारमाध्यम विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

तरी इच्छुक खाजगी चित्रपट निर्मात्यांनी आपले प्रस्ताव निर्धारित मुदतीत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विचार केला जाणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(मंगेश जोशी, भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

Digitally signed by
Mangesh Hiraman Joshi
Date: 27-09-2026
19:43:04

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

- उपसंचालक, आय.टी. व प्रसारमाध्यम विभाग, प्रस्तुत कार्यालय.
- आय.टी विभाग, SCERT, महाराष्ट्र, पुणे - सदर परिपत्रक परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तत्काळ प्रसिद्ध करण्यात यावे.